"भारतीय ज्ञानाचा खजिना" हे पुस्तक शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना उपलब्ध करून देण्यास प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता देणे बाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण १११९/प्र.क्र.७९/२०१७/साशि -५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ जून, २०१८.

<u>वाचा</u>: १. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, यांचे पत्र क्र. मुमंस/खा.स.क/ आक्र ३ /२०१७, दि.१६.०५.२०१७.
२. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे क्र. ४ / ग्रंथखरेदी/ २०१७-१८/३६१२, दि. २०.०६.२०१७ व क्र. ४ / ग्रंथखरेदी/ २०१७-१८/९०३६, दि. १०.११.२०१७ चे पत्र
३. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे जा क्र. ४ / भा.ज्ञा. ख. /२०१८-१९/२३४१ दि. २३.०५.२०१८ चे पत्र

<u>प्रस्तावना :-</u>

स्नेहल प्रकाशन प्रकाशित व श्री. प्रशांत पौळ लिखित, "भारतीय ज्ञानाचा खजिना" या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत दि. १४.०५.२०१७ रोजी पुणे येथे संपन्न झाला आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी सदर पुस्तक राज्यातील सर्व शासन अनुदानित ग्रंथालयांना पुरविण्याचे निर्देश दिले आहेत. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये "भारतीय ज्ञानाचा खजिना" हे पुस्तक राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुषंगाने "भारतीय ज्ञानाचा खजिना" हे पुस्तक शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय तसेच वित्तीय देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

स्नेहल प्रकाशन प्रकाशित व श्री. प्रशांत पौळ लिखित, "भारतीय ज्ञानाचा खजिना" हे पुस्तक शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना उपलब्ध करुन देणे या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पुस्तक उपलब्ध करुन दण्यासाठी येणारा खर्च रु. १४,२०,९६५/- (अक्षरी रु. चौदा लक्ष वीस हजार नऊशे पासष्ट फ़क्त) मागणी क्र. डब्ल्यू-४, २२०५, कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये, (०१)(०१) ग्रंथालय संचालनालय (२२०५०२५१), २१-पुरवठा व सामग्री" या लेखाशीर्षांतर्गत सन २०१८-१९ मध्ये मंजूर निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर योजनेसाठी मंजूर करण्यात आलेला रु. १४,२०,९६५/- (अक्षरी रु. चौदा लक्ष वीस हजार नऊशे पासष्ट फ़क्त) निधी खर्च करण्यास ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांना मान्यता देण्यात येत आहे तसेच त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रत्यक्ष निधी खर्च करताना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थसं-३, दि. ०२.०४.२०१८ मधील अटी व शर्तीचे पालन करावे.

५. सदर पुस्तक खरेदी ही सन २०१८-१९ या वर्षा करीता निश्चित केलेल्या सुट दरानुसार संबंधित प्रकाशक/ वितरकांकडून ग्रंथालय संचालक यांनी खरेदी करावेत.

६. उपरोक्त मंजूर करण्यात आलेला निधी ज्या बाबींसाठी खर्च करण्यास मंजूरी देण्यात आली आहे त्याच बाबींसाठी खर्च करावे व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तातडीने सादर करावे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ३४०/व्यय- ५, दि.२६/०३/२०१८ व १७८/ १८/ को.प्र. ५ दि. २६/०३/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमती नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०११२४५३८४८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2018.06.01 12:45:43 +05'30'

(अनिल वि. सावरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
५. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई / नागपूर
६. अधिदान व लेखधिकारी कार्यालय,मुंबई.
७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (व्यय-५), (को.प्र.-५) वित्त विभाग, मंत्रालय. मुंबई
९. कक्ष अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (साशि-५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.